**Publication:** Tarun Bharat
**Date:** 05.09.2015
**Page:**15
**Headline:**S.F.S Junior College wins TCS IT Wiz Quiz

# एसएफएस कॉलेजला 'टीसीएस आयटी विझ'चे जेतेपद

तभा वृत्तसेवा
नागपूर, ४ सप्टेंबर

टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसतर्फे आयोजित 'टीसीएस आयटी विझ २०१५' या



आंतरशालेय प्रश्नमंजूषा स्पर्धेत सेमिनरी हिल्स येथील एसएफएस ज्युनियर कॉलेजने स्थानिक फेरीत जेतेपद पटकावले. ही शाळा आता मुंबईत होणाऱ्या राष्ट्रीय अंतिम फेरीत नागपूरचे प्रतिनिधित्व करणार आहे. शुक्रवारी डॉ. वसंतराव देशपांडे सभागृहात ही स्पर्धा पार पडली. यात इयत्ता ८ वी ते १२ वीपर्यंतचे विद्यार्थी सहभागी झाले होते. प्रादेशिक अंतिम फेरीतील ५ फेऱ्यांमधील प्रश्नांची अचूक उत्तर देत एसएफएस ज्युनियर कॉलेजच्या राहुल भगत आणि उदित परमार यांनी स्पर्धेचा किताब पटकावला. विजेत्यांना आयपॅड प्रदान करण्यात आला. वर्धमाननगरातील सेंटर पॉईंट स्कूलचे अर्चित वेणूगोपालन आणि संचित खेडकर उपविजेते ठरले. त्यांनी ट्रॉफी आणि मेडलसह आयपॅड मिनी पटकावला. प्राथमिक लेखी फेरीनंतर प्रादेशिक अंतिम फेरीत प्रवेश मिळविणाऱ्या सहा स्पर्धकांना विविध भेटवस्तू प्रदान करण्यात आल्या. टीसीएसच्या इंटर्नल आयटी अॅण्ड शेअर्ड सर्व्हिसेस विभागाचे उपाध्यक्ष आलोक कुमार यांच्या हस्ते विजेत्यांना पुरस्कार प्रदान करण्यात आले. टीसीएसने १९९९ पासून हा ज्ञानपूर्ण उपक्रम सुरू केला असून देशातील प्रमुख १५ शहरांमध्ये ही स्पर्धा घेतली जाते.